**विशेष दिवाणी दावा क्र. १७५/२०२३ मधील निशाणी क्र. १२ कडील अर्जावर आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये निष्पादीत केलेल्या दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्रासंदर्भात दुय्यम पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्राची मुळ प्रत प्रतिवादीच्या ताब्यात असून सदर करारपत्राची झेरॉक्स प्रत वादीकडे आहे व वादीने सदर करारपत्राची झेरॉक्स प्रत निशाणी क्र. ३ कडील यादीसोबत दाखल केली आहे. भागीदारी करारपत्राची मुळ प्रत प्रतिवादीच्या ताब्यात असल्याने सदरची मुळ प्रत न्यायालयात दाखल करणे वादीच्या नियंत्रणाबाहेर आहे. वादीने प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्रासंदर्भात सदर करारपत्राच्या झेरॉक्स प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास परवानगी देण्यात यावी.

३) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिवादीला आदेशित केले आहे. परंतु प्रतिवादीने या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच वादीतर्फे निशाणी क्र. १४ कडे दाखल केलेला लेखी युक्तीवाद वाचला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तीवादाकामी प्रतिवादीला व प्रतिवादीच्या विद्वान वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादीतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे.

५) वादी हे या कामी "AIR 2009 RAJASTHAN 137, Rajesh Kumar Bhati Vs. Additional District Judge, Jodhpur and Others" या आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर व तसेच "AIR 1963 ALLAHABAD 313, British Transport Co. Ltd. Vs. Suraj Bhan and Other" या आदरणीय अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर व तसेच "AIR 1956 BOMBAY 555, Vishwanath Vithoba Vs. Genu Kisan and Others" या आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर व तसेच "AIR 1978 GUJRAT 193, Patel Manilal Chhaganlal Vs. The Municipal Corporation, Surat and Others" या आदरणीय गुजरात उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यावर विसंबून राहिले आहेत. मी उपरोक्त न्यायनिवाड्यांचे अवलोकन केले.

६) "AIR 2009 RAJASTHAN 137, Rajesh Kumar Bhati Vs. Additional District Judge, Jodhpur and Others" या न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाने परिच्छेद क्र. १० मध्ये खालीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे.

"10. As noticed above, the petitioner-defendant has taken the specific stand that the original will is in possession of the plaintiff, therefore, petitioner-defendant's claim to produce the secondary evidence is covered by clause (a) of Section 65 of the Act. In this view of the matter, the document sought to be produced by the defendant as secondary evidence deserves to be taken on record. It will be open for the plaintiff to question the genuineness of the document sought to be produced as secondary evidence at the appropriate stage."

७) वादीच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व

अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीकडून रक्कम वसूल होऊन मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार दिनांक ०३/०९/२०१८ रोजी रुपये ५००/– च्या स्टॅम्प पेपरवर भागीदार करारपत्र अस्तित्वात आले आहे. सदर भागीदारी करारपत्राची मुळ प्रत प्रतिवादीच्या ताब्यात आहे. त्यामुळे भागीदारी करारपत्राची मुळ प्रत या प्रकरणात दाखल करणे वादीच्या नियंत्रणाबाहेर आहे. प्रतिवादीने या अर्जास म्हणणे दाखल करुन दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्राची मुळ प्रत त्याच्या ताब्यात असल्याचे नाकारले नाही. वादीने या कामी निशाणी क्र. ३ कडील यादीसोबत अनु. क्र. ३ कडे सदर भागीदारी करारपत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे. प्रतिवादीने या अर्जास म्हणणे दाखल करुन दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्राची मुळ प्रत त्याच्या ताब्यात असल्याचे नाकारले नाही ही बाब विचारात घेता व उपरोक्त न्यायनिवाड्यामध्ये आदरणीय राजस्थान उच्च न्यायालयाने व आदरणीय अलाहाबाद उच्च न्यायालयाने व आदरणीय मुंबई उच्च न्यायालयाने व आदरणीय गुजरात उच्च न्यायालयाने व्यक्त केलेले मत विचारात घेता माझ्या मते वादींनी दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्रासंदर्भात सदर करारपत्राच्या झेरॉक्स प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती समर्थनीय आहे. त्यामुळे वरील नमुद कारणांमुळे माझ्या मते प्रस्तुतचा अर्ज न्यायाच्या दृष्टीने मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

१) प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) दिनांक ०३/०९/२०१८ रोजीच्या भागीदारी करारपत्रासंदर्भात

सदर करारपत्राच्या झेरॉक्स प्रतीद्वारे दुय्यम पुरावा देण्यास वादींना परवानगी देण्यात येते.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.04.15 18:09:00 +0530

दिनांकः– १५/०४/२०२५ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.